**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग**

**वित्त विभाग**

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार

अधिनियम 2005 चे

कलम 4 (1) (ख)प्रमाणे माहिती

# <u>प्रसिध्दी साठी प्रत</u>

**वित्त विभाग,**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग**

**कलम 4 (1) (ख) (i)**

| | |
|---|---|
| कार्यालयाचे नांव | वित्त विभाग , जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग |
| पत्ता | जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, सिंधुदुर्गनगरी |
| कार्यालय प्रमुख | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| शासकीय विभागाचे नांव | ग्रामविकास विभाग |
| कोणत्या मंत्रालयीन खात्याचे अधिनस्त | ग्रामविकास विभाग |
| कार्यक्षेत्र | सिंधुदुर्ग जिल्हा |
| भौगोलिक | कार्यानुरुप:- सिंधुदुर्ग जिल्हा. |
| विशिष्ट कार्ये | लेखा संकलन,देखरेख व संनियंत्रण |
| विभागाचे ध्येय / धोरण | जिल्हा परिषदेचे लेखा विषयक नियंत्रण व मार्गदर्शन जिल्हा परिषदेचे वित्तीय सल्लागार. |
| संबंधित कर्मचारी | लेखा संवर्गातील सर्व कर्मचारी |
| कार्य | सोबत आहे |
| कामाचे विस्तृत स्वरुप | सोबत आहे |
| मालमत्तेचा तपशिल | निरंक |
| उपलब्ध सेवा | - |
| संस्थे च्या रचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचे प्रत्येक स्तरावरचे तपशिल | 1.जिल्हा परिषद स्तर -वित्त विभाग व खातेप्रमुखांकडील लेखा शाखा<br>2. पंचायत समिती स्तर- गविअ लेखा शाखा |

कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक व वेळ :- 02362-228725 फॅक्स - ----

साप्ताहिक सुट्टी विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळा :- प्रत्येक शनिवार व रविवार या साप्ताहिक सुट्टया व सार्वजनिक सुट्टया वगळून सकाळी 9.45 ते सायं. 6.15

# रचनात्मक तक्ता

मुख्य कार्यकारी अधिकारी

↓

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

↓

उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

↓

**लेखाधिकारी- 1** **लेखाधिकारी- 2**

स.ले.अ. 1 आस्थापना/भांडार/ऑडिट

स.ले.अ. 2 अनुदान /बजेट/ऑडीट

स.ले.अ.3 निवृत्ती वेतन/भनिनि/ ऑडीटर

स.ले.अ. 4 बाहय लेखा

↓

**कनिष्ठ लेखाधिकारी**

↓

**वरिष्ठ सहाय्यक (लेखा)**

↓

**कनिष्ठ सहाय्यक (लेखा)**

↓

**वाहन चालक/हवालदार/परिचर**

**कलम 4 (1) (ख)(ii) नमुना (अ)**

## वित्त विभाग जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

### कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकाराचा तपशिल.

**अ**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार- आर्थिक | कोणत्या कायद्या/नियम/शासन निर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची कर्तव्ये | १) म.जि.प. व पं.स. अधिनियम, १९६१ व म.जि.प व पं.स. लेखा संहित्ता, १९६८ मध्ये विहीत केल्याप्रमाणे तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार अधिकार व कर्तव्य<br><br>२) वित्त विभाग जिल्हा परिषदेचे सर्व विभाग आणि पंचायत समित्यांच्या लेख्यांवर नियंत्रण ठेवणे.<br><br>३) वित्तीय सल्लागार व प्राथमिक लेखा परिक्षक म्हणून काम.<br><br>४) वित्तीय व्यवस्थापन व गुंतवणूका यावर नियंत्रण ठेवणे.<br><br>५) अर्थसंकल्प : जिल्हा परिषदेचे स्वतःचे उत्पन्न व शासकीय विविध योजांचे अर्थसंकल्पिय अंदाज तयार करणे.<br><br>६) आस्थापना :<br><br>१. लेखा संवर्गाची जिल्हा आस्थापना (बदली. पदोन्नती. जेष्ठतायादी ही जबाबदारी राहील.)<br><br>२. वित्त विभागाची कायर्यालयीन आस्थापना (वर्ग-१ ते ४)<br><br>३. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गाच्या अधिका-यांवर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे.<br><br>४. जिल्हा परिषदेच्या सर्व विभागातील व पंचायत समित्यामधील लेखा संवर्गावर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे.<br><br>७) पंचायत राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुर्नावलोन अहवालात समाविष्ठ लेखा आक्षेप व महत्वाचे लेखा आक्षेप तसेच भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या अहवालात समाविष्ट लेखा आक्षेप व महत्वाचे लेखा आक्षेप याबाबत समन्वय ठेवणे<br><br>८) रु.२,००,०००/- च्या वरील देयके पारीत करणे व त्याचे धनादेश अदा करणे.<br><br>९) वित्त विभागास प्राप्त होणा-या सर्व नस्त्यांचे (रु.२०००००/-च्या आतील पूर्व लेखा परिक्षण करणे व अभिप्राय देणे.<br>१०) अनुदान निर्धारण, जिल्हा परिषदेस शासनाकडून येणे व शासनास देणे स्थिती यावर नियंत्रण<br><br>११) मध्यवर्ती भांडार / पूर्ण नियंत्रण<br><br>१२) जिल्हा परिषदेचे खरेदी व्यवहार विहित पध्दतीने करणे<br><br>१३) आर्थिक शिस्तीचे पालन करण्यासाठी योग्य व आवश्यक नियोजन, उपाययोजना व अंमलबजावणी करणे.<br><br>१४) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ व | १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम-३ परिशिष्ट-एक<br><br>२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहित, १९६८ व शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे जवाबदा-या स्वतः किंवा इतर अधिका-यांकडून पूर्ण करुन घेणे.<br><br>१५) महालेखापाल, कोषागार यांच्या कार्यालयातील लेख्यांशी (जमा व खर्च) ताळमेळ घालावयाच्या कामावर नियंत्रण ठेवणे.<br><br>१६) अखर्चित रक्कमांचा आढावा घेणे व शासनाकडे वेळेत भरणा करणे<br><br>१७) वार्षिक लेखे अंतिमीकरण करुन आर्थिक स्थितीच्या अहवालासह जिल्हा परिषद सभेस सादर करणे व त्या मान्यतेनंतर शासनास सादर करणे.<br><br>१८) अंतर्गत लेखा परीक्षण भांडार पडताळणी व वेतन निश्चिती पथकाची कामे प्रभावी हाईल याद्दष्टीने संबंधित सहकारी अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून काम करुन घेणे व नियंत्रण ठेवणे.<br><br>१९) वर्ग-३, वर्ग-४ कर्मचा-याचे ताळमेळाचे काम ताळमेळासह अद्ययावत राहील यावर नियंत्रण ठेवणे.<br><br>२०) वर्ग-३, वर्ग-४ कर्मचारी व अंशदान निवृत्ती वेतन योजनेतंर्गत लेख्यांचे काम ताळमेळासह अद्ययावत राहील यावर नियंत्रण ठेवणे.<br><br>२१) जिल्हा परिषद व स्थायी समिती यांच्या सभांना उपस्थित राहून माहिती पुरविणे, सभेच्या अध्यक्षांनी विचारणा केल्यास योग्य तो वित्तीय सल्ला देणे आणि अर्थ समितीचे सचिव म्हणून काम पहाणे.<br><br>२२) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाने दिलेली कामे पार पाडणे. | | |
| | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी | 1. आस्थापना<br><br>१.१. वित्त विभागाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पहाणे (वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचा-यांचे वेतन व भत्ते, प्रवास भत्त व इतर वैयक्तिक प्रदाने इत्यादी)<br><br>1.२. जिल्हा परिषद वित्त विभागाचे आस्थापना विषयक प्रकरणे नस्त्या / प्रकरणे तपासून (सर्व) अभिप्राय देणे व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे. (सर्व प्रकारच्या रजा, वेतनवाढ, सेवापुस्तक)<br>१.३ आवक जावक शाखा विभागात येणारे टपाल सहाय्यक लेखाधिकारी हे लेखाधिकारी यांना सादर करतील व लेखाअधिकारी हे उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी योच मार्फत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करतील.<br><br>१.४ रोखशाखा- रु.२,००,०००/- च्या आतील देयके परीत करणे व त्याचे धनादेश अदा करणे (कामांच्या व खरेदीच्या संदर्भातील रु.२,००,०००/- च्या आतील अंतिम देयेके तपासून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे.)<br><br>२. निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, गट विमा योजना संबंधित प्रकरणांना मंजुरी देणे (पूर्ण अधिकार वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचा-यांच्या प्रकरणांबाबत) व परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (D.C.P.S.) (N.P.S.) योजनांचे लेखे तयार करणे व प्रकरणे तपासून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे | १) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/ वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |

३. संकलन- जिल्हा परिषद लेखा विषयक सर्व जवाबदारी वार्षिक लेखे वेळेत होतील यावर नियंत्रण.

४. अर्थसंकल्प- जिल्हा परिषद स्वतःचे उत्पन्न व शासनाच्या विविध योजना अर्थसंकल्प तयार करण्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सहाय्य करणे

५. देयक व नस्ती- पूर्व लेखा परिक्षण- सामान्य प्रशासन विभाग, ग्रामपंचायत, पशुसंवर्धन, वित्त, बांधकाम विभाग या विभागांच्या संबंधित नस्त्यांचे पूर्वलेखा परीक्षा करणे व अभिप्राय देवून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे, तसेच संबंधित विभागांच्या रुपये २,००,०००/- पर्यंतची धावती देयके पूर्वलेखा परिक्षण करून पारीत करणे व धनादेश अदा करणे. (कोणत्याही कामाचे व खरेदीचे अंतिम देयक / प्रकरणे रु. २,००,०००/- आतील असतील तरी ते देयक/प्रकरणा संदर्भात पूर्ण लेखा परीक्षण करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे) रुपये- २,००,०००/- वरील देयके/ प्रकरणे पुर्वलेखा परीक्षण करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे.

६) मध्यवती भांडार

६.१ सर्व प्रकरणे तपासून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे.
६.२ विभाग व कार्यालयाकडून येणे रक्कमांच्या वसुलीवर नियंत्रण ठेवणे

६.३ वित्त विभाग भांडार शाखेचे लेखे ठेवणे

७) अंतर्गत लेखा परिक्षण-

७.१ सर्व जिल्हा परिषदांच्या विभागाचे व पंचायत समितीचे अंतर्गत लेखा परिक्षण व भांडार पडताळणीचे पथकावर नियंत्रण व नियोजनबध्द कार्यक्रम तयार करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या मान्यतेने काम करणे (शासन परिपत्रक क्रमांक - २०१५/प्र.क्र.४२/वित्त-६ दि.५ डिसेंबर २०१५ मधील सूचना नुसार)

७.२ स्थानिक निधी लेखा, महालेखापाल व आयुक्त या सर्वाचे लेखा आक्षेपावावत व लेखा परिक्षणाबाबत समन्वय म्हणून काम करणे.

७.३ अंतर्गत लेखा परिक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेल्या वाहनाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे सल्ल्याने सनियंत्रण करणे,

८) सभा व बैठका उपस्थिती-

८.१ अर्थ समितीच्या सर्व बैठकांना उपस्थित रहाणे.

८.२ जिल्हा परिषदेच्या सभेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या सोबत उपस्थित रहाणे.

९) मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे रजा कालावधीत व पद रिक्त असताना मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणून काम पहाणे.

१०) मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सोपविलेल्या व दिलेल्या आदेशाचे पालन करणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | लेखाधिकारी - 1 | १) अर्थसंकल्पः<br><br>१.१) जिल्हा परिषदेचे स्वतःचे उपत्नन्न व शासनाच्या विविध योजनांचा अर्थसंकल्प तयार करुन वरिष्ठांना सादर करणे.<br><br>१.२) पंचायत समितीच्या अर्थसंकल्पाबाबत तपासणी व पंचायत समितीच्या उपकर अर्थसंकल्पाचे संकलन करणे व एकत्रित अर्थसंकल्प तयार करुन सादर करणे.<br><br>१.३) कार्यक्रम अदाजपत्रक (सर्व कामे)<br>१.४) रोख अनुदान व सहाय्यक अनुदाने यांची देयके तयार करुन घेऊन सादर करणे.<br><br>१.५) अर्थसंकल्पिय मंजूर तरतुदींचे पंचायत समित्यांना वाटप प्रस्तावित करणे.<br><br>१.६) केंद्रीय वित्त आयोग व महाराष्ट्र राज्य वित्त आयोग यांच्याशी संबंधित माहिती संकलित करुन सादर करणे.<br><br>१.७) अर्थसंकल्पाशी संबंधित व उपरोक्त विषयाबाबत सर्व नोंदवहया अद्ययावत ठेवणे, नियतकालीक अहवाल सादर करणे व सर्व प्रकारचा पत्र व्यवहार करणे.<br><br>१.८) आहरण केलेल्या रक्कमांचा महालेखापाल कार्यालयाच्या लेख्यांशी ताळमेळ घालणे व ताळमेळाचा अहवाल सादर करणे.<br><br>२) संकलनः<br><br>२.१) सर्व विभागाच्या लेखाशिर्षाचे जाम व खर्चाचे लेखे ठेवणे.<br><br>२.२) पंचायत समित्यांचे लेखे स्विकारणे, तपासणे व संकलन करणे.<br><br>२.३) मासिक खर्चाचे विवरण पत्र तयार करुन विहित दिनांकास सादर करणे.<br><br>२.४) वार्षिक लेखे तयार करणे व सादर करणे<br><br>२.५) अर्थसंकल्पिय तरतुदीपेक्षा कमी अथवा अधिक झालेल्या खर्चाचे विवरणपत्र तयार करुन सक्षम प्राधिका-यास सादर करणे.<br><br>२.६) अनुदान निर्धारण- मंजूर आर्थिक तरतुद खर्च प्रमाणित करुन देणे.<br><br>२.७) उपयोगिता प्रमाणपत्र- मंजूर आर्थिक तरतुद व खर्च प्रमाणित करुन देणे<br><br>२.८) जिल्हा परिषदेस शासनाकडून येणे व शासनास देणे असलेल्या रक्कमांची माहिती काढून तयार करणे.<br><br>२.९) खात प्रमुखाकडील नोंद वहयांची पंचायत समितीच्या खर्चासह लेखाशिर्षनिहाय खर्चाचा दरमहा ताळमेळ घालणे | १) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |

२.१०) खचांचे मासिक / त्रैमासिक व वार्षिक विवरणपत्रे शासनाच्या संबंधित नियंत्रण अधिका-यांना वेळेवर सादर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे.

३) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीः जिल्हा परिषदांच्या वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीचे काम पाहणे, लेखे ठेवणे, मंजुरी व अदाईचे प्रकरणे उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे, ठेव संलग्न विमा योजनेचे देयके तपासणे व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे.

४) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना-परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे लेखे ठेवणे, आहरण व वितरण केलेल्या रक्कमांचा ताळमेळ घेणे, कर्मचा-यांना त्यांच्या लेख्यांचे विवरणपत्र देणे.

५) देयक व नस्तो- पूर्व लेखा परिक्षण - कृषि विभाग, समाजकल्याण (अपंग कल्याणसह) महिला व बाल कल्याण विभाग (एकात्मिक बाल विकाससह) लघु पाटबंधारे विभाग या विभागाच्या संबंधित नस्त्यांचे पूर्वलेखा परिक्षण करणे व अभिप्राय देवून मुख्य लेख व वित्त अधिकारी यांना सादर करणे, संबंधित विभागांच्या देयकांची तपासणी करणे व रु. २,००,०००/- पर्यंतची देयक / प्रकरणे उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी याना सादर करणे व रु. २,००,०००/- वरील देयके /प्रकरणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे.

६) कर्ज:- व्याजी, बीनव्याजी कर्ज मंजुरीसाठी प्रकरणे सादर करणे, लेखे ठेवणे व्याजाची गणना करणे व वसुलीवर नियंत्रण ठेवणे,

७) अग्रिमेः - मुख्यालयातील कर्मचा-यांना व विभागांना दिलेल्या सर्व प्रकारच्या अग्रिमाचया वसुलीवर नियंत्रण ठेवणे व विभागाच्या नोंदवहयांशी ताळमेळ घेणे.

८) ठेवी:- जिल्हा निधीत जमा होणा-या सर्व विभागाच्या ठेवींचया हिशोब ठेवणे, ठेव परतावा ठेवी व्यपगत करणे, महसुल खाती जमा रक्कमांचा परतावा, अग्रीम व त्यांचे विवरण उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे.

९) वित्त विभागाची रोख शाखा- वित्त विभागात ठेवण्यात येणा-या सामान्य किर्दी-

९.१) हस्तांतरीत योजना

९.२) अभिकरण योजना

९.३) जिल्हा परिषदेचे स्वतःचे उत्पन्न

९.४) ग्रामिण पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती निधी

९.५) घसारा निधी

९.६) अल्पबचत प्रात्साहनपर अनुदान

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ९.७) आश्वासित रोजगार योजना इत्यादी रोख पुस्तके अद्ययावत ठेवणे, जमा व खर्च बाजुच्या नोंदी तपासून आवश्यक त्या नोंदी साक्षांकीत करणे, बँक ताळमेळ करणे, किर्दी वरिष्ठ अधिका-यांकडे सादर करणे. ताळमेळात तफावत आढळल्यास शोधून दूर करणे.<br><br>१०) लेखा आक्षेपाचे निराकरण- अर्थ विभागाचे अहवाल, महालेखापालाचे निरिक्षिण अहवाल आणि आयुक्त यांचे तपासणी अहवाल यातील लेखा आक्षेपाचे संबंधित शाखेकडून अनुपालन तयार करुन घेणे.<br><br>११) सोपविण्यात आलेल्या विभागाच्या योजना, अर्थसंकल्प व अडचणी इत्यादीबाबत समन्वयक म्हणून काम करणे व याबाबतची माहिती उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना देणे.<br><br>१२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी व उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सोपविलेली इतर कामे व आदेशाचे पालन करणे.<br><br>१३) सभा व बैठका उपस्थिती-<br><br>१३.१) अर्थ समितीच्या सर्व बैठकांना उपस्थित रहाणे.<br><br>१३.२) अनुक्रमांक ५ मध्ये सोपविण्यात आलेल्या विभागांच्या विषय समितीच्या सभेचा वृतांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना देणे. | | |
| 4 | लेखाधिकारी - 4 | 1) सेवानिवृत्ती वेतन विषयक कामे-<br><br>१.१) मंजुरीच्या अदाईची प्रकरणे उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे.<br><br>२.२) निवृत्तीवेतन विषयक नोंदवहया अद्ययावत ठेवणे.<br><br>.३) निवृत्तीवतन लेखा परिक्षा नोंदवही अद्ययावत ठेवणे (सामान्य प्रशासन व शिक्षण अशा दोन भागात)<br>२) वेतन निश्चिती पडताळणी- वेतन निश्चिती पडताळणी पथकाचे नियंत्रण व या संदर्भातील सर्व कामे.<br><br>३) दक्षता पथक (Vigilance) - सदर पथकाचे नियंत्रक म्हणून काम करणे. पंचायत समित्यांची तपासणी व भांडार पडताळणी अंतर्गत लेखा परीक्षण मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे विशेष निवड केलेल्या विभाग / पंचायत समितीचे अंतर्गत लेखा परिक्षण तथा भांडार पडताळणी करणे.<br><br>४) कर्मचारी गट विमा योजना राज्य शासकीय कर्मचारी व जिल्हा परिषद कर्मचारी/अधिकारी यांची गट विमा योजना विषयक काम पहाणे व लेखे ठेवणे, मंजुरी व अदाईचे प्रकरणे उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे.<br><br>५) देयक व नस्ती- पूर्व लेखा परीक्षण- आरोग्य विभाग, शिक्षण व निरंतर शिक्षण विभाग (शालेय पोषण आहारासह) पाणी | १) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरवठा व स्वच्छता विभाग या विभागांच्या संबंधित नस्त्यांचे पूर्वलेखा लेखा परिक्षा करणे व अभिप्राय देवून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे. संबंधित विभागांच्या देयकांची तपासणी करणे व रु. २,००,०००/- पर्यंतची देयके / प्रकरणे उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे व रु. २,००,०००/- वरील देयके /प्रकरणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे.<br><br>६) आवक जावक शाखा-<br><br>६.१) दैनंदिन टपाल<br><br>६.२) पोस्टल नोंदवहया व हिशोब<br><br>६.३) इतर नोंदवहयांबाबत नियंत्रण ठेवणे<br><br>७) भांडार - अर्थविभागाचे अंतर्गत भांडाराबाबत कार्यवाही करणे.<br><br>७.१) सर्व प्रकरणे तपासून सादर करणे.<br><br>७.२) नोंदवहया अद्ययावत ठेवणे.<br><br>७.३) नियतकालीक पडताळणी करुन घेणे.<br><br>७.४) अंतर्गत भांडाराच्या सर्व व्यवहारावर नियंत्रण ठेवणे.<br>८) लेखा परिक्षण-<br><br>८.१) पंचायत राज संस्थाच्या लेख्यावरील लेखापरिक्षण पुनर्विलोकन अहवाल, स्थानिक निधी लेखा विभागाचे लेखा परिक्षण अहवालातील लेखा आक्षेपाबाबत पाठपुरावा व मदत करुन अनुपालन अहवाल तयार करुन मुद्ये वगळून घेणे.<br><br>८.२) लेखा परिक्षणात / तपासणीत आढळून आलेल्या उणिवा व अनियमिततेवावत उपाययोजना सूचविणे.<br><br>८.३) लेखा परिक्षणाबाबत नियतकालीक अहवाल पाठविणे व संपुर्ण पत्रव्यवहार<br><br>९) सर्व विभाग प्रमुखांच्या नोंदवहया तपासून अर्थसमितीस सादर करणे.<br><br>१०) सोपविण्यात आलेल्या विभागाच्या योजना, अर्थसंकल्प व अडचणी याबाबत समन्वयक म्हणून काम करणे व याबाबतची माहिती वेळोवेळी उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सादर करणे संबंधित विषय समितीच्या सभेचा वृतांत अवगत करणे. अर्थ विभागाच्या नोंदवहया तपासणी करुन अर्थ समितीस सादर करणे.<br><br>११) मुख्य लेखा व वित्त अधिकारी व उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सोपविलेली इतर काम व आदेशाचे पालन करणे.<br><br>१२) सभा व बैठका उपस्थिती- | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १२.१) अर्थ समितीच्या सर्व बैठकांना उपस्थित रहाणे.<br><br>१२.२) अनुक्रमांक ५ मध्ये सोपिविण्यात आलेल्या विभागांच्या विषय समितीच्या सभेस व त्या विभागाच्या खरेदी समितीस उपस्थित राहून लेखा व वित्त विषयक सल्ला देणे व वृत्तात मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना देणे | | |

## ख

| अ.क्र. | पदनाम | अधिकार-प्रशासकीय | कोणत्या कायदा/नियम/शासकीय नर्णय/परिपत्रकरानुसार | शेरा (असल्यास) |
|---|---|---|---|---|
| 01 | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | कलम 4(1) (ख) (दोन) "क" मधिल क मध्ये नमुद केल्याप्रमाणे | १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम-३ परिशिष्ट-एक<br><br>२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |
| 02 | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी | कलम 4(1) (ख) (दोन) "क" मधिल क मध्ये नमुद केल्याप्रमाणे | 1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |
| 03 | लेखाधिकारी -1 | कलम 4(1) (ख) (दोन) "क" मधिल क मध्ये नमुद केल्याप्रमाणे | 1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |
| 04 | लेखाधिकारी -2 | कलम 4(1) (ख) (दोन) "क" मधिल क मध्ये नमुद केल्याप्रमाणे | 1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |

## ग

| अ.क्र. | पदनाम | अधिकार-फौजदारी | कोणत्या कायदा/नियम/शासकिय निर्णय/परिपत्रकानुसार अभिप्राय | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | निरंक | | |

## घ

| अ.क्र. | पदनाम | अर्धन्यायीक अधिकार | कोणत्या कायदा/नियम/शासकिय निर्णय/परिपत्रकानुसार अभिप्राय | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | निरंक | | |

## य

| अ.क्र. | पदनाम | न्यायिक अधिकार | कोणत्या कायदा/नियम/शासकिय निर्णय/परिपत्रकानुसार अभिप्राय | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | निरंक | | |

कलम 1(1) (ख) (दोन) नमुना ख

जिल्हा परिषद सिंधुदुर्ग येथील वित्त विभाग या सार्वजनीक प्राधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकार कक्षा

| अ.क्र. | पदनाम | अधिकार-प्रशासकीय | कोणत्या कायदा/नियम/शासकीय नर्णय/परिपत्रकरानुसार | शेरा (असल्यास) |
|---|---|---|---|---|
| 01 | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | कलम 4(1) (ख) (दोन) "क" मधिल क मध्ये नमुद केल्याप्रमाणे | १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम-३ परिशिष्ट-एक<br>२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |
| 02 | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी | कलम 4(1) (ख) (दोन) "क" मधिल क मध्ये नमुद केल्याप्रमाणे | 1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |
| 03 | लेखाधिकारी -1 | कलम 4(1) (ख) (दोन) "क" मधिल क मध्ये नमुद केल्याप्रमाणे | 1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |
| 04 | लेखाधिकारी -2 | कलम 4(1) (ख) (दोन) "क" मधिल क मध्ये नमुद केल्याप्रमाणे | 1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ | |

कलम 4 (1) (ख) (तीन)

कलम 4 (1) (ख) (दोन) नमुना ख

| अ.क्र | कामाचे स्वरूप | प्रत्येक स्तरावर करावयाची कार्यवाही | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | क.स/व.स | क.ले.अ/स.ले.अ/ले.अ./उप मु.ले.व.वि.अ | खाते प्रमुख | मु.का.अ | अध्यक्ष/सभापती |
| 1 | जि.प.सर्वसाधारण सभा/विशेष सभा/स्थायी समिती/वित्त समिती | प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार नियम, शासन निर्णय, परिपत्रके विचारात घेऊन नस्ती सादर करणे | क.स./व.स. यांनी सादर केल्या प्रमाणे शासन निर्णय विचारात घेऊन स्वतःचे मत नमूद करणे. | कनिष्ठ स्तरीय कर्मचारी /अधिका-यांनी सादर केलेली मते विचारात घेऊन अधिकार कक्षेनुसार निर्णय घेणे | खाते प्रमुखांनी केलेल्या शिफारसीनुसार व अधिकार कक्षेनुसार अंतिम निर्णयासाठी शिफारस करणे. | शिफारशी नुसार अधिकार कक्षेतील प्रस्तावांवर अंतिम निर्णय देणे. |
| 02 | जिल्हा निधी अंदाज पत्रक/कार्यक्रम अंदाजपत्रक | ------”--------- | ------”--------- | ------”---- | ------”--------- | ------”--------- |
| 03 | लेखा संवर्गाकडील आस्थापना विषयक कामकाज | ------”--------- | ------”--------- | ------”---- | ------”--------- | ------”--------- |
| 04 | सेवा निवृत्ती प्रकरणे (लेखा संवर्ग) | ------”--------- | ------”--------- | ------”---- | ------”--------- | ------”--------- |
| 05 | शासकीय अनुदान निर्धारण | ------”--------- | ------”--------- | ------”---- | ------”--------- | ------”--------- |
| 06 | मासिक व वार्षिक लेखा संकलन | ------”--------- | ------”--------- | ------”---- | ------”--------- | ------”--------- |
| 07 | सर्व वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचा-यांना निवृत्तीवेतन व इतर लाभ मंजूर करणे | ------”--------- | ------”--------- | ------”---- | ------”--------- | ------”--------- |
| 08 | गट विमा रकमांची अंतिम अदाई करणे | ------”--------- | ------”--------- | ------”---- | ------”--------- | ------”--------- |
| 09 | भनिनि परतावा,नापरतावा व अंतिम अदाई करणे | ------”--------- | ------”--------- | ------”---- ----- | ------”--------- | ------”--------- |
| 10 | लेखा परीक्षण | ------”--------- | ------”--------- | ------”---- ----- | ------”--------- | ------”--------- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 11 | वेतन पडताळणी | ------"--------- | ------"--------- | ------"---------- | ------"--------- | ------"--------- |
| 12 | सर्व प्रकारची देयके पारीत करणे व अदाई करणे | ------"--------- | ------"--------- | ------"---------- | ------"--------- | ------"--------- |
| 13 | पंचायत समित्यांना मागणी प्रमाणे वित्त प्रेषण करणे | ------"--------- | ------"--------- | ------"---------- | ------"--------- | ------"--------- |
| 14 | निविदा विषयक बाबी संदर्भात अभिप्राय देणे | ------"--------- | ------"--------- | ------"---------- | ------"--------- | ------"--------- |
| 15 | आर्थिक बाबी संदर्भात सर्व नस्त्यांवर अभिप्राय देणे | ------"--------- | ------"--------- | ------"---------- | ------"--------- | ------"--------- |

कलम 4 (1) (ख) (चार) नमुना "क"

4(1) (ख) (तीन) मध्ये निश्चित करुन दिलेली कार्य/कर्तव्य पार पाडण्यासाठी निश्चित करुन दिलेली मानके/निकष/प्रमाण

| अ.क्र | अधिकारपद | करावयाची कार्यवाही | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | अधिकार कक्षेनुसार निर्णय घेणे अथवा शिफारस करणे | | |
| 2 | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी | शासन निर्णय, नियम परिपत्रकाच्य अधिन राहून पर्यवेक्षण करुन प्रस्तावावर स्वतःचे मत नोंदविणे व अधिकार कक्षेनुसार निर्णय घेणे अथवा शिफारस करणे | | |
| 3 | लेखाधिकारी 1 व 2 | प्रस्तावाचे शासन नियम, शासन निर्णय, परिपत्रकाच्या अधिन राहून पर्यवेक्षण करुन स्वतःचे मत नोंदविणे. | | |
| 4 | सहाय्यक लेखाधिकारी/कनिष्ठ लेखाधिकारी | कनिष्ठ वरिष्ठ सहाय्यकाने सादर केलेल्या प्रस्तावाचे शासन नियम, शासन निर्णय, परिपत्रकाच्या अधिनराहून पर्यवेक्षण करुन स्वतःचे मत नोंदविणे | | 5 दिवस |
| 5 | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार शासन नियम, शासन निर्णय परिपत्रके विचारात घेऊन नस्ती सादर करणे. | | |
| 6 | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार शासन नियम, शासन निर्णय परिपत्रके विचारात घेऊन नस्ती सादर करणे. | | |

कलम ४ (१) (ख) (पाच) नमुना "क"

संबधित अधिकारी व कर्मचारी ४ (१) (ख) (तीन) मधील कामे पार पाडण्यासाठी उपयोगात आणतात ते नियम,मार्गदर्शक सूचना अभिलेख इत्यादी.

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी यांचे पदनाम | विभागाच्या कामकाजासाठी उपयोगात आणलेजाणारे कायदे,नियम इत्यादी |
|---|---|---|
| 1 | लेखा संवगांकडील आस्थापना विषयक कामकाज | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ |
| 2 | संवानिवृत्ती प्रकरणे | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा, वेतन, संवेच्या सर्वसाधारण शती. पदग्रहण अवधी) नियम १९८१ ३) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती (संवा प्रवेश) नियम १९६७ ४) शासनाकडून वेळोवेळी निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रक इत्यादी |
| 3 | जिल्हा निधी अंदाजपत्रक/कार्यक्रम अंदाजपत्रक | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ |
| 4 | शासकीय अनुदान निर्धारण | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिता लेखा संहिता, १९६८ व शासनाकडून निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रक इ. |
| 5 | मासिक व वार्षिक लेखा संकलन | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ व शासनाकडून निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रक इ. |
| 6 | गट विमा रकमांची अंतिम अदाई | शासनाकडून निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रक. |
| 7 | भ.नि.नि. परतावा, नापरतावा रक्कम अदाई करणे व भ.नि.नि. अंतिम अदाई करणे | महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम-१९९८ |
| 8 | लेखा परिक्षण | १. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम-१९६१<br>२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता नियम-१९६८<br>३. शासनाकडून निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रक |
| 9 | वेतन पडताळणी | १. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१<br>२. शासनाकडून वेतन आयोगाबाबत निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रक |
| 10 | सर्व प्रकारची देयके परीत करणे व अदाई करणे | १. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१<br>२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता नियम-१९६८.<br>३. शासनाकडून निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रक |
| 11 | पंचायत समित्यांना मागणी प्रमाणे वित्तप्रेषण देणे | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत |

| | | |
|---|---|---|
| | | समिती लेखा संहिता. १९६८ व शासनाकडून निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रक इ. |
| 12 | निविदा विषयक बाबीसंदर्भात अभिप्राय देणे | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता. १९६८ व शासनाकडून निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रक इ. |
| 13 | आर्थिकबाबी संदर्भात सर्व नस्त्यांवर अभिप्राय देणे | १. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम-१९६१<br>२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता नियम-१९६८.<br>३. शासनाकडून निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रक |

कलम 4 (1) (क) (सहा) नमुना

अधिकारी व कर्मचारी यांचे अधिनस्त असलेली अभिलेख कागदपत्रे

| अ.क्र | अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचे टेबल क्रमांक | हुद्दा | ताब्यात असलेली कागदपत्रे अभिलेख |
|---|---|---|---|
| 1 | भांडार | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | अभिलेख कक्षामध्ये ठेवणेत आलेली वित्त विभागाकडील सर्व शाखांचे विविध अभिलेख,नोंदवह्या व प्रमाणक नस्ती इत्यादी. |
| 4(1)ब (दोन) मध्ये नमुद केलेप्रमाणे वित्त विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार व कर्तव्य ठरवून दिलेल्या कामांशी संबंधित कागदपत्रे व अभिलेख संबंधितांचे ताब्यात आहेत. | | | |

कलम 4 (1) (ख) (सात)

धोरणत्मक निर्णय घेणेसाठी किंवा त्यांची अंमलबजावणी लोकांचे प्रतिनिधी यांचेशी सल्लामसलत करण्यासाठी अस्तित्वात असलेली व्यवस्था.

| अ.क्र | कामाचे स्वरुप | मान्यतेची कक्षा (संबंधित विषय स्थायी समिती किंवा जिल्हा परिषद) | सल्लामसलतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 1 | जिल्हा परिषद स्वनिधीचे अंदाजपत्रक | जिल्हा परिषद सभा | सर्व पदाधिकारी जि.प.सदस्य व खातेप्रमुख यांचेशी चार्चा करुन अंदाजपत्रकास मंजूरी दिली जाते. |

कलम 4 (1) (ख) (आठ) नमुना “क”

धोरणत्मक निर्णय घेणेसाठी किंवा त्यांची अंमलबजावणी लोकांचे प्रतिनिधी यांचेशी सल्लामसलत करण्यासाठी अस्तित्वात असलेली व्यवस्था.

| अ.क्र | समितीचे नाव | समितीचे सदस्य | समितीचे उद्दीष्ट | किती वेळा घेणेत येते | सभा जनसामान्यासाठी खुली आहे किंवा नाही. | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वित्त समिती | 9 | जि.प.मासिक खर्चाचा आढावा घेणे. जमा खर्चाला स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणे | महिन्यातून एकदा | पिठासिन अधिकाऱ्यांच्या समत्तीने खुली आहे. | उपलब्ध करुन दिली जाते. |

कलम ४ (१) (ख) (अकरा)

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथील वित्त विभाग कार्यालयाचे मंजूर अंदाजपत्रक व खर्चाचा तपशिल याची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.

नमुना "क" चालू वर्षासाठी

| अ.क्र | अंदापत्रकीय शीर्षाचे वर्णन | अनुदान सन 2023-24 जुलै 2023 अखेर | नियोजीत वापर(क्षेत्र कामाचा तपशिल) | अधिक अनुदान अपेक्षीत असल्यास रुपयात | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | २०५३ जिल्हा प्रशासन ०९३ जिल्हा आस्थापना म.जि.प.वपं.स. अधिनियम कलम १८३ अन्वये आस्थापना अनुदान (०१) (०५) सुधारीत कर्मचारी वर्ग मागणी क्र.एल-२ कोड नं.२०५३०५६५ | | जि.प.स्तर व पंस.स्तर | -- | -- |
| | २०५३ जिल्हा प्रशासन ०९३ जिल्हा आस्थापना म.जि.प.पं.स. अधिनियम कलम १८३ अन्वये आस्थापना अनुदान जि.प.ची कार्यक्रम अंदाजपत्रके मागणी क्र.एल-२ | | जि.प.स्तर | -- | -- |

नमुना "क" मागिल वर्षासाठी

| अ.क्र | अंदापत्रकीय शीर्ष | मंजूर रक्कम सन 2022-2023 | वापरलेली रक्कम | न वापरामुळेपरत करावी लागलेली रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | २०५३ जिल्हा प्रशासन ०९३ जिल्हा आस्थापना म.जि.प.वपं.स. अधिनियम कलम १८३ अन्वये आस्थापना अनुदान (०१) (०५) सुधारीत कर्मचारी वर्ग मागणी क्र.एल-२ कोड नं.२०५३०५६५ | | | | |
| | २०५३ जिल्हा प्रशासन ०९३ जिल्हा आस्थापना म.जि.प.पं.स. अधिनियम कलम १८३ अन्वये आस्थापना अनुदान जि.प.ची कार्यक्रम अंदाजपत्रके मागणी क्र.एल-२ | | | | |

कलम ४ (१) (ख) (बारा) नमुना "क"

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथील वित्त विभागाकार्यालयातील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपध्दती

या विभागाकडून लाभ धारकांना अशा प्रकारचे कोणतेही अनुदान दिले जात नाही.

कलम ४ (१) (ख) (बारा) नमुना "ख"

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथील वित्त विभागाकार्यालयातील अनुदान वाटप कार्यक्रमातील लाभार्थ्यांचा

| अ.क्र | लाभधारकाचे संपूर्ण नाव पत्त | दिलेल्या अनुदानाची रक्कम/दिलेल्या सवलतीची रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|
| 1 | निरंक | निरंक | या विभागाकडून अशा प्रकारचे कोणतेही अनुदान दिले जात नाही. |

कलम ४ (१) (ख) (तेरा)

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथील वित्त विभाग कार्यालयातील मिळणाऱ्या / सवलतीचा परवाना याची चालू वर्षाची तपशीलवार माहिती.

परवाना / परवानगी / सवलतीचे प्रकार

| अ.क्र | परवानाधारकाचे नांव | परवानाक्रमांक | परवाना दिल्याची तारीख | किती कालावधीसाठी वैध | सर्वसाधारण अटी | परवान्याचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

कलम ४ (१) (ख) (चौदा)

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथील वित्त विभाग कार्यालयातील माहितीचे इलेक्ट्रॉनिक स्वरुपान साठविलेली माहिती प्रकाशित करणे. चालू वर्षाकरिता.

| अ.क्र | दसतऐवजाचा प्रकारु | विषय | कोणत्या इलेक्ट्रीक नमुन्यात | माहिती मिळावी याची पध्दती | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|
| | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## कलम ४ (१) (ख) (पंधरा)

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथील वित्त विभाग कार्यालयात उपलब्ध सुविधांचा तक्ता प्रकाशित करणे.

. उपलब्ध सुविधा

. भेटण्याच्या वेळे संदर्भात माहिती

. वेब साईट विषयी माहिती

. कालसेंटर विषयी माहिती

. अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहिती

. कामांच्या तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहिती

. नमुने मिळणेबाबत उपलब्ध माहिती

. सुचना फलकांची माहिती

. ग्रंथालय विषयी माहिती

| अ.क्र | सुविधेचा प्रकार | वेळ | कार्यपद्धती | ठिकाण | जबाबदार व्यक्ती | तक्रार निवारण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध सुविधा | 09.45 ते 18.15 | अभिलेखात प्राप्त झालेल्या अभिलेख्यांची नोंदवही (वर्गीकरण निहाय) | वित्त विभाग | लेखाधिकारी | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| 02 | ग्रथालय विषयक माहिती | 09.45 ते 18.15 | कार्यालयाच्या वापरासाठी | वित्त विभाग भांडार शाखा | लेखाधिकारी | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |

# कलम ४ (१) (ख) (सोळा)

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथील वित्त विभाग कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी / सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी (तेथील लोकप्राधिकारीच्या कार्यक्षेत्रातील) यांची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.

नमुना "क"

जन माहिती अधिकारी.

| अ.क्र | शासकिय माहिती अधिकारी यांचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | दुरध्वनी नंबर | ई-मेल | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.बाळासाहेब भिमराव पाटील | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी | वित्त विभाग | 228725 | cafozpsindhudurg@gmail.com | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |

नमुना "ख"

सहाय्यक जन माहिती अधिकारी.

| अ.क्र | सहाय्यक जन माहिती अधिकारी यांचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | दुरध्वनी नंबर | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीम.प्रणाली प्रविण म्हापणकर | लेखाधिकारी-1 | वित्त विभाग | 228725 | cafozpsindhudurg@gmail.com |

नमुना "ग"

प्रथम अपिलीय अधिकारी.

| अ.क्र | अपिलीय अधिकारी यांचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | अहवाल देणारे जन माहिती अधिकारी | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीम.राजश्री शिवाजीराव पाटील | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | वित्त विभाग | | cafozpsindhudurg@gmail.com |

## कलम ४ (१) (सतरा) (ग)

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथील वित्त विभाग कार्यालयामध्ये जनतेच्या जिव्हाळयाचे नित्यनियमीत निर्णय आणि काही महत्वाचे धोरणात्मक निर्णय.

---------------------------------------------------- निरंक----------------------------------------------------------------------

## कलम ४ (१) (सतरा) (घ)

सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथील वित्त विभाग कार्यालयामध्ये घेतले जाणारे काही महत्वाचे प्रशासनिक आणि अर्धन्यायीक निर्णय.

---------------------------------------------------- निरंक----------------------------------------------------------------------

(राजश्री पाटील)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग